# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


तांत्रिक/म.हल्ला

जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१९/ ८८९

दिनांक :- 13 MAR 2019

प्रति,

प्राचार्य,

शासकीय/अनुदानीत पदविका, पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था

औरंगाबाद विभाग

**विषय**:-दिव्यांग कर्मचा-यांच्या विविध प्रश्नाबाबत करावयाची कार्यवाहीबाबत.

**संदर्भ** :- मा. आयुक्त विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांचे पत्र क्र.२०१९/सा.प्र./दिव्याबै/ कावि-४९१, दि. ०१-०३-२०१९

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, औरंगाबाद विभागातील विविध शासकीय कार्यालयामध्ये दिव्यांगासाठी असलेल्या योजनांची /सोयी सुविधांची हवी तशी अंमलबजावणी होत नसल्यामुळे विभागीय आयुक्त कार्यालयामध्ये मा. आमदार श्री ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, विधानसभा सदस्य यांनी प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलनाचे विभागातील जिल्हाध्यक्षासोबत बैठक घेतली. सदर बैठकीत घेतलेल्या आढाव्यानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देशित करण्यात येत आहे.

१. दिव्यांगासाठी सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालयामध्ये रॅम्पची व्यवस्था करणे, करमणूक केंद्र, उद्याने व विश्रामगृह येथे स्वतंत्र व्यवस्था करावी. तसेच दिव्यांगासाठी विशेष शौचालये निर्माण करणे या कामी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहकार्य घेणेबाबत सर्व कार्यालय प्रमुखांनी कार्यवाही करावी.

२. प्रत्येक कार्यालयामध्ये एक खिडकी योजनाप्रमाणे अपंगासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करुन त्यामध्ये दिव्यांगाचे अर्ज, तक्रार अर्ज स्विकारणे तसेच त्यावरील कार्यवाहीची पत्रे त्याच कक्षामधून संबधितांना निर्गमीत होतील अशी व्यवस्था निर्माण करणे. त्याचप्रमाणे प्रत्येक शासकीय कार्यालयामध्ये कामासाठी/भेटीसाठी आलेल्या अभ्यांगतामध्ये वृध्द दिव्यांग (अपंग),लहान बालके असलेल्या महिला यांना प्राधान्य देणे.

आपल्या संस्थेमध्ये वर दर्शविलेल्या सोयी/सुविधा व दिव्यांगासाठी स्वतंत्र कक्ष आहे किंवा कसे? तसेच वरील सोयी/सुविधा असल्यास त्याचा अहवाल ०३ दिवसाच्या आत या कार्यालयास सादर करण्यात यावा. वरील सोयी/सुविधा नसल्यास त्याबाबत कार्यवाही करुन त्याचा अहवालही तात्काळ या कार्यालयास सादर करण्यात यावा.

(महेश शिवणकर)

प्र.सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रतः या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना वेबसाईवर अपलोड करण्यासाठी.

RAM/dte and other sr office